**<u>निशाणी क्र. ३६ कडील अर्जावरील आदेशान्वये उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०९. माझे शिक्षण बी.ए., जी.डी.सी.ए. असे आहे. सन २०१४ मध्ये जी.डी. सी.ए.ची परिक्षा पास झाले. सन २०१० मध्ये मी बॅकेमध्ये जॉबला लागले. मी क्लार्क म्हणून बॅकेत नोकरीस लागले. सन २०२३ मध्ये मी 'सहाय्यक व्यवस्थापक' या पदावर बॅकेत कार्यरत होते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, बॅकेच्या नियमाप्रमाणे आमच्या बॅकेत खाते उघडावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने आमच्या बॅकेत खाते उघडले होते. आता आरोपीने कधी खाते उघडले होते ते माझ्या लक्षात नाही. आरोपीने आमच्या बॅकेत खाते उघडले त्या संदर्भात कागदोपत्री पुरावा आमच्याकडे आहे. मी त्याची मूळ प्रत दाखल करु शकेन. साक्षीदार पुन्हा सांगतो की, बचत खात्याची झेरॉक्स प्रत मी दाखल करु शकेन. आरोपीचे लोन अकाऊंट, बचत खाते, आर.डी. व शेअर्स असे चार खाते आहेत. चारही खात्यांची मूळ कागदपत्र आमच्याकडे उपलब्ध आहेत. मी ते दाखल करु शकेन. चारही खाते वेगवेगळ्या दिवशी चालू करण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांच्या तारखा व खाते क्रमांक आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे कोणतेही खाते उघडण्यात आलेले नाही.

११. आरोपी हा आंबेपूर–पेझारी येथील राहणारा आहे. आमच्या बॅकेमध्ये खाते उघडताना ओळखीच्या लोकांच्या सह्या लागत नाहीत. आरोपी त्यावेळेस नोकरीस होता. त्या संबंधी आरोपीकडून कागदपत्रे घेतली होती. आम्ही ती कागदपत्रे दाखल करु शकतो.

१२. बचत खाते उघडल्यानंतर अंदाजे एक महिन्यानंतर कर्जाची मागणी

:: ::

करता येते. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मागणी प्रक्रियेदरम्यान माझा कोणताही सहभाग नसतो. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज खाते मी स्वत: पाहते. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज खात्यासंदर्भात आमच्याकडे वेगळे क्लार्क नियुक्त झालेले नाहीत. बचत खाते रुपये १००/— ने उघडले जाते व शेअर्स रुपये १,०००/— चे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यासंदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या बचत खात्याचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१३. कर्ज मागणी अर्जाची किंमत रुपये २५/— असते. कर्ज मागणी अर्जाची पावती आम्ही देतो. अंदाजे दि. ०१/०२/२०२३ रोजी आरोपीला कर्ज मागणी अर्ज दिला होता. त्याची नोंद आमच्याकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यासंदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला कर्ज मागणी अर्ज दिल्यासंदर्भात रजिस्टरची प्रत मी दाखल केलेली नाही. सदर प्रत मी दाखल करु शकते.

१४. आरोपीला कर्ज मागणी अर्ज दिल्यानंतर किती दिवसांनी मिटींग झाली होती हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेची मासिक सभा असते. हे म्हणणे खरे आहे की, मिटींगमध्ये सभासद करण्याबाबत निर्णय घेतला जातो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला सभासद करण्यासाठी ठराव झाल्यासंदर्भात कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. जामीनदार पेझारीचे होते. एकाचा पत्ता पेझारीचा व दुसऱ्याचा पत्ता कुर्डुसचा आहे. त्यांची नावे अक्षय लिलाधर ठाकूर व सूरज हरिश्चंद्र पिंगळा अशी आहेत. जामीनदारांचे ओळखीचे कागदपत्र घेतले होते. आम्ही पाटील सूरज याचा जामीन घेतला नव्हता.

१५.     निशाणी क्र. २५ मधील ‘पाटील’ या शब्दावर काठ मारलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २५ कडील फॉर्म आरोपीने भरलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २५ वर बॅकेचा शिक्का नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, चेअरमनची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २५ वर चेअरमन यांचा शिक्का नाही.

१६.     आरोपीने कर्ज मागणीचा अर्ज अंदाजे जानेवारीमध्ये ४–५ तारखेला दिला होता. त्यानंतर आरोपीने दुसरा अर्ज दिलेला नाही. दि. ११/०१/२०२३ रोजी आरोपीला कर्ज मंजूर झाले होते. त्यासंदर्भात बॅकेचा ठराव झाला होता त्याची प्रत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचवेळेला आरोपीकडून वचन चिठ्ठी, कोरा धनादेश सुरक्षितता म्हणून घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज थकीत झाल्यानंतर तो चेक बॅकेत टाकला जातो. हे म्हणणे खरे नाही की, त्या चेकवर रक्कम भरुन आम्ही बॅकेत टाकलेला आहे.

१७.     थकबाकी मागण्याकरीता आरोपीला बॅकेची नोटीस दिली होती. ती नोटीस या केसमध्ये दाखल नाही. आम्ही ती दाखल करु शकतो. बॅकेची मागणी नोटीस ४१,८५७/– रुपयांची होती. ती नोटीस डिसेंबर–२०२३ मध्ये पाठविली होती. त्याची नोंद आहे. मी त्याची प्रत दाखल करु शकेन.

१८.     नोटीस पाठविल्यानंतर आरोपी भेटण्यास आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस पाठविल्यानंतर ते चेक बाऊंस होईपर्यंत आरोपी बॅकेत आला नव्हता. आरोपी अंदाजे २६–२७ डिसेंबरला बॅकेत आला होता. नक्की तारीख माझ्या आता लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या नावाने नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मागणी नोटीस वाचलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की,

निशाणी क्र. २५ वर चेअरमनची सही नाही. निशाणी क्र. २५ वर कर्जदार म्हणून आरोपीची सही आहे.

१९. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ३२ वरील सही व निशाणी क्र. २५ वरील सहीमध्ये फरक आहे. आरोपीचे शिक्षण काय आहे हे मला माहिती नाही. फिर्यादी बॅंकेचे खाते सारस्वत बॅंक, अलिबाग शाखा येथे आहे. चेक वटण्याकरीता बॅंकेत भरल्याबाबतची काऊंटर स्लीप आमच्याकडे आहे. ती मी दाखल करु शकेन. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बॅंकेमध्ये दिवसाला व्याज वाढते.

प्रश्न : दि. २७/१२/२०२३ रोजी रुपये ४१,८५७/— आरोपीकडून येणे असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही?

उत्तर : निशाणी क्र. २८ कडे त्यासंदर्भात पुरावा दाखल केलेला आहे.

साक्षीदार सांगते की, दि. २७/१२/२०२३ पर्यंतचा खाते उतारा असून लास्ट अमाउंट दि. २७/१२/२०२३ रोजीची आहे.

२०. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २८ वर दि. १७/१२/२०२३ रोजी रक्कम रुपये ४१,८५७/— अशी दाखवलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, १० दिवसानंतर आउटस्टॅन्डीग रक्कम बदलणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७ तारखेला आरोपी ४१,८५७/— पेक्षा जास्त रक्कम देणे लागत होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रुपये ४१,८५७/— पेक्षा जास्त देणे लागतो ही कल्पना चेक टाकताना आम्हाला होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे सेक्युरिटी असलेला चेक आम्ही आधीच भरुन ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, खाते उताऱ्यामध्ये देखील रक्कम चुकीची आहे.

२१. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २८ कडील खाते उतारा हा दि.

०१/०४/२०२३ ते २७/१२/२०२३ पर्यंतचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, बॅलन्स दि. २७/१२/२०२३ पर्यंतची दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७/१२/२०२३ रोजीची अमाउंट चुकलेली आहे.

२२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दि. २७/१२/२०२३ रोजी रक्कम ४१,८५७/– पेक्षा जास्त रक्कम देणे लागत होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीकडून घेतलेला सेक्युरिटी चेक बॅंकेत टाकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, चेक कोणी लिहीलेला आहे हे मला माहिती नाही. आरोपीकडून चेक घेतल्याबाबत नोंद घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सेक्युरिटी संदर्भात दिलेल्या चेकचा गैरवापर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मागणी नोटीस मिळालेली नाही. मी स्वत: थकीत हप्त्यांची नोटीस दिलेली आहे. मी दिलेली नोटीसची पोच दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतेही अधिकार नसताना मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या पद्धतीने केस दाखल केलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०८/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.